पुण्य नगरी

# तुळसकर कॉलेज ऑफ फार्मसी येथे रक्तदान शिबिर

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी




**हिंगणघाट :** विद्याविकास शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग तुळसकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तुळसकर कॉलेज ऑफ फार्मसीतील रासेयो व रेडरिबन क्लब तसेच उपजिल्हा रुग्णालय, हिंगणघाट यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, २९ नोव्हेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

विद्याविकास शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग तुळसकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने रक्तदान शिबिराची विधिवत सुरुवात करण्यात आली. संस्थाध्यक्ष डॉ. उमेश तुळसकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या रक्तदान शिबिराला संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. नीलेश तुळसकर, सचिव डॉ. नयना तुळसकर, कोष्याध्याक्ष रेखा तुळसकर, फार्मसी कॉलेजचे विभागप्रमुख प्रा. प्रदीप रघाटाटे, उपजिल्हा रुग्णालय हिंगणघाटचे डॉ. अजय लिडबे, ब्लड बँक पिआरओ प्रवीण गावंडे, डॉ. स्नेहा तापडिया यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रदीप रघाटाटे यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. उमेश तुळसकर यांनी रक्तदान करण्याकरिता विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. यावेळी उपस्थितांनी मार्गदर्शन केले.

संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. नीलेश तुळसकर यांनी रक्तदानाचे महत्व विषद केले. संस्थेच्या सचिव डॉ. नयना तुळसकर यांनी युवकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. अभय दांडेकर यांनी केले तर आभार प्रा. राकेश जोशी यांनी मानले. रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेकरिता प्रा. राकेश जोशी, प्रा. पायल बकाणे, प्रा. शीतल पाटील, प्रा. अंजू तन्ना, प्रा. नयनतारा पाचपोर व शिक्षकेतर कर्मचारी आणि एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. यावेळी प्रा. राकेश जोशी, प्रा. अंजू तन्नासह विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने रक्तदान करून शिबिरास उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

Wardha Edition
Dec 05, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com